# उदयास येत असलेल्या एका पुढाऱ्याचे पत्र (पुढाऱ्यांची बांधणी कशी होते)

“मी उदयास येणारा एक पुढारी आहे. तुम्ही एक पुढारी म्हणून तुमची आधीच ओळख आहे. देवाने तुम्हाला माझ्या जीवनात स्थान दिले म्हणून मी खूप कृतज्ञ आहे. मला तुमची खरोखर गरज आहे!

प्रथम, कृपा करून मला देवाचे वचन शिकवा – कारण सत्य हेच जीवन आहे. सत्य माझी विचारसरणी बदलू शकते. ते माझे जीवन परिवर्तित करू शकते. पण तुम्ही पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने आणि खात्रीपूर्वक रीतीने मला शिकवावे ही माझी गरज आहे; केवळ शब्दांनी नव्हे, तर खात्रीपूर्वक आणि सामर्थ्यानिशी शिकवावे.

पण केवळ शिकवून गोष्ट संपवू नका; तुम्ही आपल्या जीवनाविषयी मला सांगावे ही माझी गरज आहे. केवळ सैद्धांतिक कल्पना मला शिकवू नका; तुमच्या जीवनाबाबत पारदर्शक व्हा. तुम्हांला आलेले देवाचे अनुभव मला सांगा, तुम्ही पाहिलेले विजय, आणि तुम्ही ज्यात अपयशी ठरला त्या गोष्टी. तुमच्या आशा, निराशा, तुमचे सुखाचे क्षण, तुमची वैफल्ये – ते सारे मला सांगा.

मला शिक्षण देण्यासोबत, कृपा करून माझ्या जीवनात खरेपणाने माझ्याशी जडून राहा. तुम्ही खरेच माझी काळजी वाहता हे जाणून घ्यायची मला गरज आहे, मला काही कामे करण्यासाठी केवळ शिकवून तयार करायचे आणि नंतर तुमच्या पायदळातील एक सैनिक म्हणून बाहेर पाठवायचे एवढाच तुमचा उद्देश नाही हे मला कळायला हवे. कृपा करून माझा केवळ उपयोग करून घेऊ नका. तुम्ही माझ्यावर प्रीती करता आणि माझ्या हितासाठी वाहून घेतलेले आहात हे जाणण्याची मला गरज आहे. विविध मार्गांनी ही बांधिलकी व्यक्त करा. जेव्हा मी काही चांगले करतो, तेव्हा पाठिंबा द्या. जेव्हा मी चुका करतो, तेव्हा प्रीतीने आणि सौम्यपणे मला जबाबदार धरा, दोषदुरुस्ती करून मला सुधारा.

कृपा करून माझ्यावर जबाबदाऱ्या टाका; माझ्या परिपक्वतेला अनुरूप असलेल्या जबाबदाऱ्या. माझ्या जीवनात सेवाभाव उपजून वाढावा म्हणून त्यात काही सामान्य कामे असावीत. पण माझा दृष्टिकोन अधिक व्यापक व्हावा आणि माझे पाचारण स्पष्ट व्हावे यासाठी मला काही महत्त्वाच्या गोष्टी देखील करायला सांगा. ह्या जबाबदाऱ्या काळजीपूर्वक ठरवून अशा असाव्यात की त्यातून माझ्यावर ताण पडावा आणि शिकण्यासाठी, वाढ होण्यासाठी आणि यशप्राप्ती व्हावी म्हणून देवाकडे मागणे मला भाग पडावे.

मी ह्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना, मला एकटा सोडू नका; माझ्यासोबत राहा आणि मला उत्तेजन द्या. आणि केवळ आपणच नव्हे; माझ्या जीवनाभोवती इतर नातेसंबंध जोडा. चर्चमधील इतर परिपक्व बंधूभगिनींनी मला त्यांचा आत्मिक पुत्र म्हणून स्वीकारावे ह्यासाठी त्यांना उत्तेजन द्या. माझ्या जीवनात व्यवहार्य आणि अर्थपूर्ण रीतींनी त्यांनी कसे अंतर्भूत व्हावे हे त्यांना कळण्यासाठी त्यांना साहाय्य करा. त्यांच्या जीवनातून, एक परिपक्व विश्वासणारा म्हणजे काय ते मला दिसेल. मी ते पाहीन. मी तुमच्याकडून केवळ शिकणारच नाही. मी ते पाहणार आहे. मला ते पाहिलेच पाहिजे!

परिपूर्ण नसलेले पण तरीही निकोप स्वास्थ्य लाभलेले असे विवाह पाहायची मला गरज आहे. काही दिवसांनंतर माझे लग्न होणार आहे. लग्नाचा अर्थ काय आणि त्याचे कार्य कसे चालते हे समजण्याची मला गरज आहे. तुम्ही मला शिकवले की जसा ख्रिस्त चर्चवर (मंडळीवर) प्रीती करतो तसे पतीने आपल्या पत्नीवर प्रीती केली पाहिजे. तुमच्या शिकवणीवर आत्म्याची समक्षता असल्यामुळे, तिने मला हेलावले व स्पर्श केला; मी इतका भावूक झालो होतो की जेव्हा मी पवित्र शास्त्रात हे पाहिले तेव्हा मी रडलो. पण मला ते अजूनही जीवनात पाहायचे आहे. मी ते पाहिलेच पाहिजे. माझ्या भोवतालच्या जीवनांमध्ये मला ते पाहिलेच पाहिजे.

जीवनात त्या लोकांनी देखील माझ्यासोबत चालावे ह्याची मला गरज आहे. वेगवेगळे अनुभव, जबाबदाऱ्या आणि दबाव ह्यांतून मी जात असताना, मला हे कळले पाहिजे की मी हे एकट्याने करीत नाही, तर माझ्याशी निष्ठ असलेले, पाठिंबा देणारे, उत्तेजन देणारे आणि माझ्यासाठी प्रार्थना करणारे असे इतर लोक माझ्यासोबत आहेत. सहन करीत कसे टिकून राहायचे हे मी त्यांच्या जीवनातून पाहीन. मला टिकून राहण्याची गरज आहे हे मी जाणतो; ते तुम्ही मला छान शिकवले. पण ते पाहायची मला गरज आहे. तुम्ही अशा काही भयंकर धगधगत्या वेदना सोसत असताना तुमच्यासोबत असायची मला गरज आहे. तुम्ही टिकून राहताना मी पाहीन. त्या प्रकारे मी ते लक्षात ठेवणार आहे. त्यातूनच मला पूर्ण समज येईल.

म्हणून कधी कधी, मलाही तुमच्या बरोबर घेऊन जात जा. तुम्ही ते नेतृत्वाचे काम करीत असताना मला तुम्हाला पाहू द्या. मला तुमचे शिकवणे फार आवडते, पण तुम्ही ते प्रत्यक्ष करताना पाहायची मला गरज आहे!

तुमच्यासोबत चालत असताना आणि आपण एकत्रपणे गोष्टी करीत असताना, एक पुढारी असणे म्हणजे काय ते मला अधिक सखोलपणे कळेल. कठोर परिस्थितींत कठीण निर्णय तुम्ही घेत असताना मी पाहीन. तुम्ही ज्या लोकांची सेवा करीत आहात त्यांच्यासाठी प्रार्थना करताना आणि त्यांच्यासाठी अश्रू ढाळताना मी पाहीन. तुम्ही लोकांशी सबुरीने वागता तेव्हा मी तुमच्याबरोबर असेन. दोषी असलेल्या लोकांना तुम्ही सुधारत असतांना मी तुमच्याबरोबर असेन. अशा रीतीने ते काम स्वतः कसे करायचे ते मी शिकेन.

तुम्ही माझ्या जीवनाकडे पाहता, तेव्हा माझ्यासाठी देवाचा हेतू काय आहे ते पाहायला मला साहाय्य करा आणि मला कामगिरी नेमून द्या. मला काम करते ठेवण्यासाठी सतत संधी शोधत राहा. मला निष्क्रिय राहू देऊ नका. मला दूर एकीकडे बसून शांत राहू देऊ नका. मला बोलते करून म्हणा, “अरे, चल ये माझ्या मुला! देवाच्या दृष्टान्ताकडे पाहा. देव काय करीत आहे आणि तू त्याच्यामध्ये काय होऊ शकतोस! आणि काय करू शकतोस! ते पाहा. चल ये!” माझ्या जीवनाच्या पाचारणाला पाठिंबा द्या. देवाने मला एक अद्भुत उद्देश दिला आहे. “चल पुढे ये! तू हे करू शकतोस!” असे म्हणत माझ्यासमोर सतत ऐस. जेव्हा “नाही, मी करू शकत नाही” असा माझा प्रतिसाद असेल, तेव्हा मला बोल, “होय, तू करू शकतोस.” मला पाठिंबा देत राहा. मला आव्हान देत राहा. मग, माझ्यासभोवती असलेल्यांसोबत जाऊन ते करण्यासाठी मला पाठवून दे.

माझ्यासभोवती असलेल्या इतरांशी - सेवाकार्यातील भागीदार आणि त्यांचे संघ यांच्याशी - हेतुपुरस्सर, माझा संबंध जोडा. सुज्ञपणे देवाने मला कसे निर्माण केले ह्याबद्दल त्याची प्रशंसा करतात अशा लोकांशी माझे संबंध जोडून द्या. काही वेळा, ज्या लोकांशी माझे मतभेद होतील हे तुम्हांला माहीत आहे अशा लोकांशी मुद्दाम मला जोडा. आणि मग आमच्यामध्ये लहान सहान कटकटी होतील, आणि काही ठिणग्या उडतील. आणि मला वाईट वाटेल. तुम्ही माझ्यावर नजर ठेवीत आहात हे माझ्या लक्षात येईल आणि मी तुम्हांला तोंडघशी पाडले असे मला वाटेल. पण तुम्ही चिडणार नाही अशी मी काळजी घेईन. तुम्ही सावधपणे आणि प्रीतीने माझ्याकडे याल. तुम्ही म्हणाल, “अरे, चल ये! जरा खोलात जाऊ. तुझ्या जीवनात काही वाईट गोष्टी आहेत ना? आणि ह्या नातेसंबंधाने, ह्या परिस्थितीने, तर सर्वात वाईटच उकरून काढले आहे. म्हणून, ते आता खोदून काढून टाकू.”

गत काळात, कोणालाही माझ्या अंतस्थ गोष्टींना स्पर्श करू देण्याची मला फार भीती वाटत असे, पण तुम्ही मजबूत नातेसंबंध स्थापले आहेत. तुम्ही माझ्या बाजूने आहात, माझ्याशी निष्ठा राखायला वाहिलेले आहात. म्हणून, सावधानतेने मी किंचितसा उघडेन. आणि तुम्ही माझ्यासोबत प्रार्थना कराल आणि माझ्या जीवनातील काही दुःखे तुम्हांला दिसून येतील. आपण दोघेही एकत्रितपणे त्यांना सामोरे जाऊ. ज्यांनी माझ्यावर अन्याय केला आहे त्यांना क्षमा करावी म्हणून तुम्ही मला हळुवारपणे उत्तेजन द्याल. कटुता आणि वेदना ह्यांपासून मुक्त करणाऱ्या वाटेने तुम्ही मला पुढे न्याल. माझ्या नातेसंबंधात जो हा मतभेद आला तो समजण्यास तुम्ही मला साहाय्य कराल की, माझ्या अंतःकरणातील समस्यांना नातेसंबंध कारणीभूत नव्हते; त्या नातेसंबंधांनीं त्या समस्या केवळ उघड्यावर आणण्याचे काम केले. ह्या सर्व गोष्टींत तुम्ही माझ्याबरोबर कार्य करीत असताना, जीवनाच्या संघर्षात देव माझ्याशी कसा व्यवहार करतो ते मला अधिक कळून येईल. तो मला प्रखर अग्नी ज्वालांतून चालत जाऊ देतो. तुम्ही मला ह्याविषयी पेत्राच्या पहिल्या पत्रातून शिकवण दिली हे मी आठवीन; आता मला माझ्या जीवनात हे कळत आहे. इतर आत्मिक माता व पिते माझ्या जीवनातील ही पारदर्शकता हळुवारपणे जोपासतील.

आव्हाने, गुंतागुंती आणि जीवनाचे दबाव, ह्यांच्या मध्यात ह्या, सर्व गोष्टी हाताळत असताना, स्वतःला सत्याच्या आधीन ठेवत, देवाला पूर्णपणे शरण जाऊन, हे गहन, जोपासना करणारे, सांभाळणारे, जबाबदार नातेसंबंध, देव मला बदलून टाकतील. मी स्वतःला अधिक बंधमुक्त झालेला दिसेन. ख्रिस्ती जीवनाचा खरा स्वभावगुण मला कळत आहे हे मला कळून येईल. नेतृत्वाचा गुणधर्म काय असतो ते माझ्या लक्षात येत आहे. केवळ एक सिद्धान्त म्हणून नव्हे. कोणीतरी महत्त्वाचे आहेत असे म्हणतो ते काही “आठ मुद्दे” नव्हेत. पण मला आता कळू लागले आहे. मी ते पाहात आहे. जीवनाच्या खोल, आव्हानात्मक अनुभवांतून जात असतांना देवाच्या वचनाच्या सत्याने, आत्म्याच्या सामर्थ्याने, प्रेमळ, संगोपन करणाऱ्या, जबाबदार कुटुंबाच्या मध्ये माझ्यात बदल घडत आहे. मला देव गवसत आहे

मी त्याला तुमच्या जीवनात, आणि माझ्या सभोवती असलेल्या माझ्याशी निष्ठा राखणाऱ्या इतरांच्या जीवनात पाहीन. प्रार्थना कशी करावी हे मी शिकेन, कारण मी तुम्हांला प्रार्थना करताना पाहतो. देवाची भक्ती करताना मी तुम्हाला पाहीन. अशा रीतीने, देवाची भक्ती करणे म्हणजे काय ते मी शिकेन. केवळ त्याची भक्ती करण्यासाठी मला निर्माण करण्यात आले आहे हे अद्भुत प्रकटीकरण मी देवाच्या वचनात पाहीन. मी हे समजून घेईन. आणि नंतर मी ते करीन कारण ते करण्यासाठी तुम्ही मला उत्तेजन द्याल. ते कसे करावे ते मला कळेल कारण मी तुम्हांला ते

करताना पाहिले आहे. मी हे करीत असताना, आत्म्याद्वारे मला अधिकच बदलण्यात येईल. मी त्याची ओळख करून घेईन. माझे अंतःकरण त्याच्याकडे कसे वळवावे, त्याला शोधावे, त्याला पाहावे, त्याला जाणून घ्यावे हे मी शिकेन. मी देवाला जाणून घेईन. आणि देवाविषयी माझ्याकडे चांगले तत्त्वज्ञान देखील असेल.

चांगला मित्र असणे म्हणजे काय हे मी शिकेन कारण मला मित्र आहेत. ते माझ्यावर प्रीती करतील आणि माझ्याकडून कधी काही वाईट कृत्ये घडली, तरी ते मला निष्ठ राहतील. ते नेहमीच माझ्या बाजूने उभे राहतील. ते मला नाकारणार नाहीत. तुम्ही माझ्या बाजूने असणार. देव म्हणतो की तो मला कधीही नाकारणार नाही हे जे तुम्ही मला शिकवीत आला आहात ते मला कळणे सुरू होईल. तुम्ही मला होशेयविषयी जे शिकविले - की जरी होशेयची पत्नी त्याला विश्वासू नव्हती, तरी तो तिला विश्वासू राहिला - ते मला उमजू लागेल. आणि देव त्याच्या लोकांना म्हणाला, “मी तुम्हांला तसे वागवून. मी तुम्हांला कधीही सोडून टाकणार नाही.” जेव्हा तुम्ही मला हे शिकवले ते मी स्मरण - त्या वेळी माझे हृदय उल्लास पावले, आणि पुन्हा देवाची इतकी अति सुंदर समक्षता लाभली की शिकवण चालू असतांना मी रडलो. पण आता मी ती अधिक स्पष्टपणे, अधिक समृद्धीयुक्त अशी पाहीन, कारण तुम्ही ते करतांना मी पाहतो. मला पवित्र शास्त्र कळाले, पण जीवनात ते कसे दिसते ह्याविषयी मला खात्री देता येईना. ते कसे कार्यान्वित होईल? मला पुष्कळ प्रश्न होते. पण आता तुम्ही माझ्या प्रश्नांना उत्तर दिले आहे, केवळ तुमच्या शिकवणुकीतून नव्हे तर तुमच्या जीवनातून. मी पाहतो म्हणून आता मी जाणतो. मला वाटत होते की मला माहीत होते, आणि एका दृष्टीने, मला माहीतदेखील होते. पण आता मी ते खरोखर जाणतो. त्याने मला बदलून टाकले.

सर्व कठीण समयी, मी एकटा नसणार; तुम्ही माझ्याबरोबर असाल. मला माहीत आहे की, तुम्हांला केवळ एक फोन कॉल करायची मला गरज असेल. जर मी येऊन तुमचे दार ठोकले तर तुम्ही मदतीला धावून याल. फक्त मी तुमच्याकडे येतो तेव्हाच केवळ नव्हे, तर तुम्ही देखील माझ्यामागे याल आणि मला जबाबदार धराल. मला जेव्हा पळून जावेसे वाटते तेव्हा, किंवा दडून बसावे असे वाटते, तेव्हा तुम्ही मला तसे करू देत नाही. अधिकार दाखवून नव्हे, पण ठामपणे तुम्ही माझ्याकडे याल. तुम्ही म्हणाल, "चल, इकडे ये! काय प्रश्न आहेत ते पाहू या, एकत्रितपणे, मिळून आपण ह्यांचा सामना करू या. तू ह्या सर्व गोष्टीतून अधिक उंच उठू शकतोस. एकत्रितपणे, मिळून, आपण देवाचा धावा करू या. ही अडचण आणि दबाव असताना, तुझ्या जीवनात त्याचा हस्त पाहण्यासाठी आपण देवाकडे पाहू या. आपण एकत्र मिळून देवाकडे दृष्टी लावू या.”

तुमच्याकडे पाहून, लोकांसोबत काम करण्याचा अर्थ काय असतो हे मी शिकेन. चांगल्या लोकांसोबत कसे काम करायचे ते मी शिकेन. अवघड लोकांसोबत कसे काम करायचे ते मी शिकेन. चांगले निकोप लग्न मिळविण्याचा अर्थ काय असतो ते मी शिकून घेईन, कारण विवाहात खरे काय घडत असते हे पाहण्यासाठी तुम्ही मला मुद्दाम आमंत्रण द्याल. आणि मला आता पत्नी सापडली असे जेव्हा मला वाटते तेव्हा तुम्ही मला मदत कराल. तुम्ही आम्हांला परिपक्व जोडप्यांशी जोडून द्याल, आणि ते त्यांची जीवने आणि संघर्ष याविषयी आम्हांला पारदर्शकपणे सांगतील.

मला असे दिसेल की माझ्या जीवनात पूर्वी असायचे ते सर्व भंगार आणि जगिकता निघून जातील. सत्याने मी बदलला जाईन. आत्म्याच्या कार्याने मी बदलला जाईन. माझ्या भोवती असलेल्या ह्या प्रेमळ समुदायामध्ये मी बदलून जाईन. आम्ही अनुभव, दुःख सहन आणि जीवनाची आव्हाने ह्यातून एकत्र प्रवास करू. देव माझ्या जीवनात खरे पावित्र्य निर्माण करील आणि त्यातून मला एक निष्ठावान मनुष्य बनवील - केवळ चांगल्या गोष्टी बोलणे जाणणारा कोणीतरी असा नव्हे, केवळ इतर लोक पाहत असताना चांगला अभिनय करणे जाणणारी असा कोणीतरी असा नव्हे, तर खरी निष्ठा असलेला माणूस – कारण तुम्ही माझ्या जीवनात खोलवर कार्य केलेले आहे. वरपांगी गोष्टींनी तुमचे समाधान होईना. माझ्या अंतःकरणात खरे जे होते ते व्यक्त करायच्या संधी देणारे अनुभव तुम्ही माझ्यासाठी उत्पन्न केले. मग जेव्हा तेथे मनात असलेले सारे काही बाहेर आले, तेव्हा देवाच्या वचनाच्या सत्याप्रमाणे ते समजण्यासाठी मला मदत करीत, त्याला आधीन होण्यासाठी, ते सर्व त्याला देण्यासाठी मला मदत करीत, आणि खरेपणाने त्याची कृपा मिळविण्यासाठी तुम्ही माझ्या बाजूला माझ्या सोबत होता. – त्याच्या कृपेविषयी केवळ जाणून घेण्यासाठी नव्हे, तर ती प्रत्यक्षपणे ग्रहण करण्यासाठी. माझ्या आतील काही तरी बदलले; अंतर्वर्ती असलेले, माझ्या अंतःकरणात, खऱ्या निष्ठेने, प्रामाणिकतेने जन्म घेतला. मला माहीत आहे की मी परिपूर्ण नाही. मी परिपूर्ण होणार नाही हे मला माहीत आहे, कारण मी जेव्हा तुमच्याकडे पाहतो तेव्हा मला परिपूर्णता दिसत नाही. म्हणून माझ्या बाबतीत काही वेगळे असणार नाही हे मला कळते. पण मला हे माहीत आहे की माझे सर्व काही ठीक होईल, कारण मी ते तुझ्या जीवनात पहिले आहे.

मला तुमच्यासारखे व्हायचे आहे. तुमचा उद्देश आणि चर्चचे भवितव्य जाणून घेण्यासाठी तुम्ही देवाकडे कशी धाव घेता ते मी पाहतो, तम्ही ते करताना मी पाहतो तेव्हा माझ्या अंतःकरणावर घट्ट पकड घेतली जाईल, कारण तुमच्या अंतःकरणावर पकड घेतलेली मी पाहिली आहे. मी तुमचा भावावेश, तुमचा दृष्टांत पाहीन. तुमच्या जीवनाचा त्याग मी पाहात असताना - मी तो पाहतो तसा - स्वेच्छेने त्याग करण्याची तयारी माझ्यामध्ये स्फुरुन उठेल. येशूचे अंतःकरण प्रतिबिंबित करणारा, हरवलेल्यांसाठी तुमचा भावावेश मी पाहीन तेव्हा माझे अंतःकरण बदलले जाईल.

तुमच्याभोवतीच्या सर्व गुंतागुंतीच्या गोष्टी, तुमचे जीवन आणि सेवाकार्यात जे घडत आहे त्यातील क्लिष्टता ह्यावर तुम्ही नजर टाकत असताना मी तुम्हाला पाहीन. तुम्ही ह्या सर्व गोष्टींनी दडपून गेलेले मला दिसणार नाही. पण ह्या क्लिष्टताना तुम्ही भग्न हृदयाने आणि देवाचे मुख अधिक निरखून पाहून प्रतिसाद देता. ते तुम्ही करतांना मी पाहीन. मी तुम्हाकडे पाहात असेन. ह्या सर्व गुंतागुंतीच्या गढूळ गोष्टींकडे तुम्ही पाहू शकता आणि नंतर एक निर्णय घेऊन म्हणता, “आम्ही जेथे जाणार आहोत ते ह्या ठिकाणी.” आत्म्याच्या मार्गदर्शनाने तुम्ही एक स्पष्ट दिशा निश्चित करता. माझ्यावर त्याचा परिणाम पडेल. माझ्या उर्वरित आयुष्यात मी ते स्मरणात ठेवीन. मी हे शिकत आहे अशी जाणीव होत नसेल तरी अगदी तीच गोष्ट स्वतः करायला मी शिकेन. मी गुंतागुंतीच्या परिस्थितीमध्ये कधी पडलो तर देवाकडे पाहाणे हा माझा सर्वप्रथम प्रतिसाद असेल. – कारण तुम्ही तेच केले. तुम्ही ते पुष्कळ वेळा करताना मी पाहिले आहे. म्हणून त्याच्याविषयी विचार न करता देखील मी तीच गोष्ट करीन. का कोण जाणे, युद्धनीतीसारखा विचार करून निर्णय घेण्याच्या तुमच्या क्षमता मला स्पर्श करून गेल्या आहेत. विचार करण्याची ही क्षमता मी आत्मसात करीन. केवळ विचार करण्याचीच नव्हे, पण कृती करण्याची सुद्धा. तुम्ही ते करताना मी पाहून घेतलेले असेल. जेथे कमी कुवतीचा पुरुष किंवा स्त्री अनिश्चितपणे बसून राहिले असते त्या परिस्थितीत मी पुष्कळ वेळा तुम्हाला पाहिलेले असेल. पण तुम्ही जबाबदारी घेतली. तुम्ही बाहेर पडायचा सोपा मार्ग धरला नाही. गुंतागुंत आणि, कधी कधी, द्यावे लागलेले मोल मोठे असतानाही तुम्ही ती जबाबदारी स्वीकारली. अनेक वेळा तुम्ही ते केलेले मी पाहिले असेल. मला हे कळून आले नाही की का कोण जाणे त्याचा परिणाम माझ्यावरही झाला. आता मी तेच करीन, कारण तुमच्या शिकवणीतून तम्ही मला बदलले आहे. इतक्या साऱ्या निरनिराळ्या मार्गांनी मला देवाकडे आणण्याने तुम्ही मला बदलले आहे. माझ्या जीवनातील अडचणी आणि आव्हाने पेलताना तुम्ही माझ्यासोबत चालत असतांना, तुमच्या आदर्श कित्याने आणि तुमच्या परस्परिक देवाण घेवाणीने, तुम्ही मला बदलले आहे.

नंतर माझ्या लक्षात येईल की मी त्याच प्रकारे इतरांची सेवा करू शकेन अशा संधी तुम्ही मला दिल्यात - ज्यामध्ये माझ्यासाठी तुम्ही जे झाला आहात तेच मी त्यांच्यासाठी होईन.

“एके दिवशी, अकस्मात, मला कळून येईल की लोक माझ्याकडे नेतृत्वाच्या अपेक्षेने पाहात आहेत. आणि मी ओळखून घेईन की मी लोकांना पुढे न्यावे आणि त्याच्या लोकांची सेवा करावी ह्यासाठी देव मला वाढवून उंच करीत गेला आहे. माझ्याभोवतीच्या इतर जीवनांद्वारे, त्याच्या समक्षतेद्वारे, त्याच्या वचनाने, जीवनाच्या अनुभवांमध्ये, देवाने मला बदलले आहे, मला तयार केले आहे, माझी बांधणी केली आहे. मला माहूत आहे की मी कधीही परिपूर्ण असणार नाही, पण आता मी ते करू शकतो. मी लोकांना घेऊन पुढे जाऊ शकतो. माझी बांधणी झाली आहे - चांगली बांधणी झाली आहे.

## अधिक माहितीसाठी

आमच्या संपूर्ण नमुन्यांसाठी (मॉडेल्स) कृपया पाहा : माल्कम वेबर ह्यांची *सक्षम पुढारी : आत्म्याने घडविलेले पुढारीपण #२* आणि *पुढारी घडवणे : आत्म्याने घडविलेले पुढारीपण #४* ही पुस्तके पाहा.